

www.magicalmelghat.com

Melghat Tiger Conservation Foundation

सत्यमेव जयते

# लोणार वन्यजीव अभयारण्य


## अकोला वन्यजीव विभाग, अकोला

## मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती

# माहिती पुस्तिका

LONAR WILDLIFE SANCTUARY

www.lonarwildlifesanctuary.com



लोणार वन्यजीव अभयारण्य
LONAR
WILDLIFE SANCTUARY
To Saraswati village
To Mehkar
To Palaskhed
To kinhi
To Loni
To Talani
Mehkar
Legend
Gate
Major_Landmarks
Protection_Camp
Quarter
Rest House
RFO_Office
Temple
Tower
Camera Location
Contour
Drainage
Road
Prosopices
Compartment_Boundary
Beat_Bounary
Water_Body
Range_Name
Mehkar
0 0.15 0.3 0.6 0.9 1.2
Kilometers



# लोणार वन्यजीव अभयारण्य

## अकोला वन्यजीव विभाग, अकोला मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती

Website: **www.magicalmelghat.com, www.lonarwildlifesanctuary.com**
E-mail: **projecttigermelghat@gmail.com, lonarwildlifesanctuary@gmail.com**
Phone No.: **0721-2662792**

LONAR WILDLIFE SANCTUARY
www.lonarwildlifesanctuary.com


- संकल्पना :
  **श्रीमती जयोती बॅनर्जी** (भा.व.से.)
  मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक
  मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती

- मार्गदर्शक :
  **श्री. मनोजकुमार खैरनार**
  विभागीय वन अधिकारी
  मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती

- लेखन व माहिती संकलन :
  **प्रफुल्ल सावरकर**
  उपजीवीका तज्ञ
  मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती

- मुखपृष्ठ डिझाईनींग :
  **आनंद विपट**
  ग्राफिक डिझायनर
  मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती

- प्रकाशक :
  **मेळघाट व्याघ्र संवर्धन प्रतिष्ठान**
  **मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती**
  E-mail: projecttigermelghat@gmail.com
  Website: www.magicalmelghat.com

LONAR WILDLIFE SANCTUARY
www.lonarwildlifesanctuary.com



# अनुक्रमणिका


प्रस्तावना .. .. ०१
मनोगत .. .. ०२
मनोगत .. .. ०३
ओळख .. .. ०४
जैवविविधता .. .. ०७
वन्यप्राणी .. .. ०७
पक्षी .. .. ०८
फुलपाखरे .. .. ०९
वृक्ष .. .. १०
सरपटणारे प्राणी .. .. १०
कोळी .. .. ११
पौराणिक इतिहास .. .. ११
लोणार संवेदनशील क्षेत्र .. .. १३
राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण .. .. १३
निसर्ग पर्यटन .. .. १४
संरक्षण व संवर्धन व्यवस्थापन .. .. १४
गुलाबी रंगाचे पाणी .. .. १५
पुरातन काळातील मंदिरे .. .. १६




LONAR
WILDLIFE SANCTUARY
www.lonarwildlifesanctuary.com


रामसर पाणथळ क्षेत्र
लोणार सरोवर
नोव्हेंबर २०२० ला या सरोवराला रामसर पाणथळ क्षेत्र म्हणून गौरविण्यात आले आहे.
हे महाराष्ट्रातील दुसरे व भारतातील ४१ वे रामसर पाणथळ क्षेत्र आहे.
LONAR
WILDLIFE SANCTUARY
www.lonarwildlifesanctuary.com
लोणार वन्यजीव अभयारण्य : माहिती पुस्तिका

# प्रस्तावना



**श्रीमती जयोती बॅनर्जी (भा.व.से.)**
**मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक**
**मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती**

नमस्कार,

मला आपणास कळविण्यात आनंद होत आहे कि, मेळघाट व्याघ्र प्रकल्पा अंतर्गत येत असलेले जग प्रसिध्द व भौगलिक वारसा असलेले लोणार वन्यजीव अभयारण्य संदर्भातील माहिती पुस्तिका आपल्यापर्यंत पोहचवतांना मला खूप आनंद होत आहे.

५० ते ५२ हजार वर्षापूर्वी उल्कापाताने तयार झालेले हे सरोवर आपल्या सर्वांसाठी महत्वाचा ठेवा आहे. इतिहास व विज्ञानाचा वारसा लाभलेल्या या लोणार सरोवराचे व या क्षेत्रात असलेल्या वन्यजीवांचे संरक्षण व संवर्धन व्हावे या महत्वाच्या उद्देशांने ८ जून २००० ला या सरोवर व भोवतालील ३.८ चौरस किलोमीटरचे परिसर क्षेत्र हे अभयारण्य म्हणून घोषित करण्यात आले होते आणि या जग प्रसिध्द अभयारण्याचे व्यवस्थापन व संरक्षण करण्याची जबाबदारी मेळघाट व्याघ्र प्रकल्पाकडे आहे, याचा मला अभिमान आहे.

लोणार सरोवर हे केवळ एक तळ नसून जैवविविधतेने संपन्न असलेले क्षेत्र आहे. यामध्ये बिबट, तडस, कोल्हा, काळवीट, नीलगाय हे वन्यप्राणी निर्भयपणे भ्रमण करतात तर १३५ ते १४० स्थानिक व स्थलांतरीत पक्ष्यांचे अधिवास क्षेत्र आहे. फुलपाखरांच्या ५५ ते ६० प्रजाती येथे बघायला मिळतात तर वृक्षांच्या सुध्दा ३० प्रजाती आहे. असे हे छोटसे संपन्न अभयारण्य आपल्या सर्वांचे आवडते क्षेत्र आहे.

या लोणार अभयारण्यांचे महत्व लक्ष्यात घेता नोव्हेंबर २०२० ला या सरोवराला रामसर पाणथळ क्षेत्र म्हणून गौरविण्यात आले आहे. हे महाराष्ट्रातील दुसरे व भारतातील ४१ वे रामसर पाणथळ क्षेत्र आहे आणि ही आपल्या सर्वांसाठी खूप अभिमानाची बाब आहे.

लोणार अभयारण्य हे काटेकोरपणे सुरक्षित राहवे याकरिता या अभयारण्यांच्या भोवतालील क्षेत्र हे पर्यावरण संवेदन क्षेत्र म्हणून केंद्र सरकारने घोषित केले आहे.

पौराणिक वारसा लाभलेले या लोणार सरोवराभोवती असलेले हेमाडपंथी मंदिर ही आपल्या संपन्न संस्कृतीचे दर्शन घडवितात.

आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय विद्यापीठातून येणाऱ्या संशोधकांनी या सरोवरावरती केलेल्या अभ्यास अत्यंत महत्वपूर्ण आहे तर शाळा, महाविद्यालय, विद्यापीठातील विद्यार्थी लोणार सरोवराला भेट देऊन माहिती जाणून घेतात हे ही महत्वपूर्ण आहे. आजचे विद्यार्थी उद्या वेग-वेगळया पैलूने या सरोवराविषयी अभ्यास करतील व नवीन विश्व आपल्या पुढे उलगडवतील. देश विदेशातील पर्यटकांनी लोणार अभयारण्याला दिलेली पसंती ही या सरोवर व अभयारण्याचे महत्व प्रधान करते.

लोणार वन्यजीव अभयारण्यात कार्यरत असलेले वन अधिकारी व कर्मचारी या सरोवर व वन्यजीवांचे संरक्षण व संवर्धन करण्याकरिता नेहमी तत्पर असतात, त्यासाठी त्यांचे मनापासून आभार व अभिनंदन.

या लोणार वन्यजीव अभयारण्य माहिती पुस्तिकेसाठी सुंदर व महत्वपूर्ण छायाचित्र उपलब्ध करून दिले, त्यासाठी सर्व छायाचित्रकारांचे आभार. तसेच या माहिती पूर्ण पुस्तकांचे लेखन सर्व सामान्य लोकांपर्यंत पोहचतील अशा साध्या व सोप्या भाषेत लिखाण केलेले श्री. प्रफुल्ल सावरकर यांचे कौतुक तर या पुस्तकाची उत्तम व नीटनेटकेपणाने श्री. आनंद विपट यांनी केलेली मांडणी सुंदर आहे.

शेवटी एवढच सांगायचे आहे कि, हे लोणार वन्यजीव अभयारण्य आपल्या सर्वांचे आहे व या वारसाचे संरक्षण व संवर्धन करणे व पुढील पिढीपर्यंत उत्तम स्थितीत पोहचविणे हे आपले नैतिक कर्तव्य आहे.

धन्यवाद!

# मनोगत



श्री. मनोजकुमार खैरनार
(विभागीय वन अधिकारी)
मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती

नमस्कार,

लोणार वन्यजीव अभयारण्यावर आधारित माहिती पुस्तिका आपल्या सर्वांसमोर सादर करतांना मला अतिशय आनंद होत आहे. लोणार सरोवर ही आपल्याला निसर्गानी दिलेली अनमोल देणगी असून या देणगीचे संरक्षण व संवर्धन करण्याची जबाबदारी अकोला वन्यजीव विभागा अंतर्गत येते. लोणार अभयारण्याला रामसर पानस्थळाचा दर्जा प्राप्त झाला आणि या सरोवरला पक्ष्यांचे सरोवर म्हणून ही वेगळी ओळख सुध्दा संपूर्ण विश्वामध्ये मिळाली आहे. ८ जून २००० ला सरोवराला अभयारण्याला दर्जा देऊन गौरविण्यात आले आणि येथील वन्यजीवन सुरक्षित व अबधित राहीले.

विभागीय वन अधिकारी, अकोला वन्यजीव विभागाचा पदभार सांभाळतांना लोणार वन्यजीव अभयारण्य माझ्या अधिकार क्षेत्रात होते. त्यामुळे मला या सरोवराविषयी नितांत प्रेम व आदर आहे आणि अनेकादा मी सरोवराला भेट दिली आहे. खुपदा सर्व वन कर्मचारी यांच्यासोबत खाली सरोवराजवळ उतरून गस्त ही केली आहे. सरोवराचा परिसर अगदी जवळून निहाळला सुध्दा आहे. येथील पक्षी व प्राणीजीवन अनुभवलेले आहे. या शिवाय हे छोटसे अभयारण्य वन्य प्राण्यांच्या अधिवासाने ही संपन्न आहे. यामध्ये बिबट हा महत्वाचा प्राणी असून तृणभक्षी प्राणी सुध्दा समाधानकारक स्थितीमध्ये आहे.

अनेकादा माझ्या मनामध्ये या अभयारण्या-बद्दल एक उत्तम छायाचित्र स्वरूपातील माहिती पुस्तिका तयार करण्याची कल्पना आलेली होती आणि आता या कल्पनेचे सत्यात रूपांतर झाले आहे. याचा मला नितांत आनंद होत आहे. या माहिती पुस्तिकाच्या निमित्ताने या जगावेगळया व सुंदर सरोवराचे व अभयारण्याचे महत्व व माहिती सर्व शाळा, महाविद्यालय, विद्यापीठ व समाजातील सर्व स्थरावर पोहचेल याबद्दल मला नक्कीच खात्री आहे.

या माहिती पुस्तिकामध्ये लिखाणासोबत छायाचित्रांचा केलेला योग्य असा वापर हे पुस्तिका आपल्याशी बोलतेय अशा स्वरूपात दिसते. या पुस्तकाचा पुरेपूर फायदा लोणार वन्यजीव अभयारण्यामध्ये कार्यरत असलेले वन कर्मचारी व निसर्ग मार्गदर्शकांना नक्कीच होईल याची मला जाणीव आहे.

सदर पुस्तिका पूर्णत्वास नेण्यासाठी मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक श्रीमती जयोती बॅनर्जी मॅडम यांचा मी मनापासून आभारी आहे.

या पुस्तिकेसाठी छायाचित्रकांरानी उपलब्ध करून दिलेल्या सुंदर छायाचित्रांबद्दल मी त्यांचा ही आभारी आहे. तर माहिती पुस्तिकाची लेखनाची धुरा सांभळणारे श्री. प्रफुल्ल सावरकर, उपजीविका तज्ञ व उत्तम मांडणी करून या पुस्तकाला योग्य असे स्वरूप देणारे श्री. आनंद विपट, ग्राफिक्स डिझायनर यांचे अभिनंदन!

शेवटी या पुस्तिकातून जन सामान्यामध्ये निसर्ग व लोणार अभयारण्याविषयी जिव्हाळा निर्माण होईल अशी अपेक्षा आहे.

# मनोगत



प्रफुल्ल सावरकर
उपजीवीका तज्ञ
मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती

नमस्कार,

लोणार वन्यजीव अभयारण्यावर आधारित हे माहिती पुस्तिका आपल्या सर्वांसमोर सादर करतांना मला खूप आनंद होत आहे. लोणार वन्यजीव अभयारण्यावर आधारित माहिती पुस्तिका लिहण्याची जबाबदारी माझ्याकडे सोपविण्यात आली तेव्हा मला मनापासून आनंद झाला. जागतिक स्थरावर नावाजलेले व आपल्या देशाचा महत्वाचा अंग असलेले लोणार वन्यजीव अभयारण्यावर आधारित माहिती पुस्तिका तयार करण्याकरिता विविध माध्यमातून माहित संकलित करायला सुरूवात केली. वाचन केले आणि विविध विषयानुसार प्राध्यापक, आम्ही लोणारकर समुहाने व निसर्गप्रेमींनी उत्साहाने छायाचित्र दिली आणि सर्वांच्या सहकार्याने सदर माहिती पुस्तिका पूर्ण झाले.

ही माहिती पुस्तिका लिहित असतांना सर्व सामान्य व विशेषत: शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, लोणार सरोवर प्रेमी, निसर्ग मार्गदर्शक आणि वन कर्मचारी यांना अगदी पुस्तिका बघताच आवडायला हवे अशा अपेक्षाने तर प्रत्येकांनी आवर्जून पूर्ण पुस्तक वाचायला हवे या हेतूने लेखनाचा व छायाचित्रांचा योग्य वापर करण्याचा प्रयत्न केला.

ही माहिती पुस्तिका लिहायला घेतांना मी लोणार वन्यजीव अभयारण्य येथे प्रत्यक्षात भेट दिली. संपूर्ण अभयारण्य बघितले. अगदी नैसर्गिक पायवाटांवरून सरोवराच्या जवळ जाऊन तर वरती असलेल्या कपारीच्या काठावर बसून लोणार सरोवर अनुभवले तर संपूर्ण परिसरामध्ये भ्रमण केले. हे अनुभवत असतांना मला जाणवायला लागले कि हे निसर्गाचे अद्भुत विश्व आहे आणि या विश्वाची व्याप्ती जन सामान्यापर्यंत पोहचावी हा हेतू मनात होता आणि धकाधकीच्या जीवनात व्यस्त असलेल्या भारतीय माणसाला लोणार वन्यजीव अभयारण्यांचे महत्व कळावे हा उद्देश मनाशी धरून विविध छायाचित्रांचा योग्य वापर करून पुस्तक पूर्ण केले.

ही माहिती पुस्तिका लिहण्यासाठी श्री. श्रीनिवास रेड्डी सरांनी (तत्कालीन अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती) यांनी मला प्रोत्साहित केले होते तर श्रीमती जयोती बॅनर्जी मॅडम (मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती) यांनी मला हे पुस्तक पूर्णत्वास नेण्याकरिता पाठबळ दिले. श्री. मनोजकुमार खैरनार सर (विभागीय वन अधिकारी, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती) यांनी लिखाणापासून तर लोणार अभयारण्य भेट व पुस्तक पूर्ण करण्यापर्यंत मोलाचे सहकार्य केले आहे, या सर्व मान्यवरांचा मी मनापासून आभारी आहे तर लोणार वन्यजीव अभयारण्य येथे कार्यरत असलेले वन परिक्षेत्र अधिकारी श्री. सुशांत पाटील सर व त्यांची टीम व स्थानिक निसर्ग मार्गदर्शक यांनी केलेल्या सहकार्यामुळे हे माहिती पुस्तिका पूर्ण होत आहे. तर श्री. आनंद विपट (ग्राफिक्स डिझायनर, मे.व्या.प्र., अमरावती) यांनी सुंदर व समतोल राखणारी मांडणी योग्य स्वरूपात दर्शवली आहे.

तसेच प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या ज्यांनी या लोणार वन्यजीव अभयारण्य माहिती पुस्तिका करिता सहकार्य केले त्या सर्वांचा मी मनापासून आभारी आहे. शेवटी या माहिती पुस्तकाचा आनंद सर्वांनी घ्यावा व अभिप्राय व सूचना द्याव्यात व आपले लोणार वन्यजीव अभयारण्य सुरक्षित व अबधित राहण्याकरिता प्रार्थना करावी.

धन्यवाद!

## ओळख



भारत व महाराष्ट्र राज्याचा मानाचा तुरा असलेले खाऱ्या पाण्याचे लोणार सरोवर जगप्रसिध्द आहे. या सरोवराचा आकार बशीसारखा गोलाकार आहे.



संशोधाकांच्या आणि वैज्ञानिक अभ्यासानुसार व निरीक्षणानुसार, साधारणतः ५० ते ५२ हजार वर्षापूर्वी या सरोवराची निर्मित उल्कापाताने झाली आहे. विशेष म्हणजे, बेसाल्ट खडकामुळे तयार झालेले हे सरोवर जागतिक ३ क्रमांकाचे व भारतातील एकमेव सरोवर आहे.





या सरोवराला राष्ट्रीय भौगलिक वारसा हा दर्जा दिला आहे तर जिओलॉजीकल व आर्कॅलोजिकॅल दृष्टया लोणार सरोवर हे एक जागतिक दृष्टया महत्वाचे केंद्र आहे.



खाऱ्या पाण्याच्या या सरोवराची पहिल्यांदा नोंद ब्रिटीश अधिकारी सी.जे. अलेक्झांडर यांनी १८२३ मध्ये घेतली आणि त्या नंतर या सरोवाराविषयी संशोधनाला सुरूवात झाली.



५० हजार वर्षापूर्वी पृथ्वीवर चार विवर तयारी झाली, त्यापैकी अग्निज खडकांनी तयार झालेले जगातील एकमेव विवर आहे.



लोणार सरोवराचा सरासरी व्यास १.२ किलोमीटर आहे आणि तो सरोवराच्या खालच्या बाजूस सुमारे १३७ मीटर इतका आहे. उल्का खडकाचा रिम व्यास सुमारे १.८ किलोमीटर आहे.



२० हजार किलोमीटर प्रति सेकंदया वेगाने उल्का येथे पडली म्हणजे हिरोशिमा व नागासाकी मध्ये टाकण्यात आलेल्या अणुबॉम्बच्या स्पोटामध्ये झालेल्या परिणामापेक्षा अधिक मोठ्यापटीने उल्का येथे येऊन आदळली.





इतिहास व विज्ञानाचा वारसा असेल्या या सरोवरचे संरक्षण व संवर्धन व्हावे व पुढच्या पिढीला सुध्दा या वैज्ञानिक संशोधन व बघण्याकरिता अशा दृष्टीक्षेपातून जून २००० साली या सरोवर व भोवतातील ३.८ चौरस किलोमीटरचे परिसर क्षेत्र हे अभयारण्य म्हणून घोषित करण्यात आले आहे. हे अभयारण्य



जैव विविधतेने सुध्दा संपन्न क्षेत्र आहे.



लोणार वन्यजीव अभयारण्य हे महाराष्ट्र राज्यातील बुलडाणा जिल्हामध्ये आहे व लोणार-मठा राज्यमार्ग क्रमांक ७१ च्या उजव्या बाजूस स्थित आहे.



LONAR
WILDLIFE SANCTUARY
www.lonarwildlifesanctuary.com

भारतीय वन्यजीव संस्थान
Wildlife Institute of India



भारतीय वन्यजीव संस्थान, देहरादून यांनी केलेल्या जैव भौगलिक वर्गीकरणानुसार ६(ब) मध्यवर्ती दंखन पठार अंतर्गत मोडते तसेच चंपियन व शेठ यांच्या वर्गीकरणानुसार लोणारचे वनक्षेत्र ५अ- दक्षिण उष्ण कटबंधीय शुष्क पानझडी वन असून उप प्रकार ५अ/क १ साग वृक्ष असे आहेत. अभयारण्य क्षेत्रात नव्याने झालेल्या वर्गीकरणानुसार एकूण १४२ सपुष्प







वनस्पती आढळून आले आहेत.

लोणार वन्यजीव अभयारण्य हे ३६५.१८ हेक्टर क्षेत्रामध्ये विस्तारलेले असून यापैकी राखीव क्षेत्र २६६.०८ एवढे आहे तर महसूल क्षेत्र ७७.६९ एवढे असून खाजगी क्षेत्र हे २१.३९ एवढे आहे.




या अभयारण्यांची अक्षांस १९°५८'४०" ते १९°५८'४२" रेखांक्ष ७६°३१'४५" ते ७६°३१'५६" या प्रमाणे आहे. या वनाचा प्रकार दक्षिण उष्ण कटबंदीय वनक्षेत्रामध्ये मोडते.



हे अभयारण्य क्षेत्र समुद्रीसपाटी पासून १५५१ ते १९५२ फुट उंचावर आहे तर हे क्षेत्र चढ-उताराचे असून मुख्यत्वे गवताळ व वृक्षच्छादित आहे.



वृक्षाच्या ३० प्रजाती इथे दिसतात. ज्यामध्ये साग, लेंडी, तेंदू, अंजन, बेहडा, बाबुळ, धावडा, हिवर, सलाई, ऐन, पळस इत्यादी प्रजाती आढळतात तर झुडूप प्रजातीच्या १० जाती आहेत, १३ प्रकाराचे



वेलवर्गीय आहे आणि ६ प्रकारचे गवताच्या प्रजातीची नोंद केली आहे.

## जैवविविधता



या अभयारण्य परिसरामध्ये दोन तलाव सुध्दा आहे. सौंदर्य दृष्टया ही समृध्द असलेले या सरोवराचे पाणी निळसर व हिरवट रंगानी बहरलेले दिसते.

## वन्यप्राणी

लोणार सरोवर व परिसरातील वन्य प्राण्यांचे संवर्धन व संरक्षण व्हावे या हेतूने या परिसराला अभयारण्यांचा दर्जा देऊन गौरविले आहे. यामुळे या सरोवर परिसरातील वन क्षेत्रातील वन्य प्राण्यांना अभयदान मिळाले. या







अभयारण्य क्षेत्रात बिबट, रानमांजर, तडस, कोल्हा, काळवीट,



LONAR WILDLIFE SANCTUARY
www.lonarwildlifesanctuary.com





नीलगाय, सायाळ, रानडुक्कर, ससा इत्यादी प्राणी आढळून येतात.

## पक्षी

लोणार अभयारण्य हे पक्षी विश्वाने ही समृध्द व संपन्न आहे. या क्षेत्रात १३५ ते १४० च्या जवळपास स्थानिक व स्थलांतरीत पक्ष्यांची नोंद झाली आहे. या सरोवरातील







पाण्याच्या विशेष गुणधर्मामुळे येथे इतर तलावा -प्रमाणे जीवसृष्टी आढळत नसून मासे व इतर







जलचरांऐवजी विशिष्ट गुणधर्म असलेले शेवाळ व पाण वनस्पती आढळतात. यामुळे या सरोवरा







-वर येणारे पक्षी सुध्दा विशिष्ट प्रकारचे असतात. मासे खाणारे बदक, पानकावळे व इतर पक्षी येथे शक्यतो दिसत नसून पाण वनस्पती खाणारे बदक व हंस प्रकारातील पक्षी येथे मोठ्या प्रमाणात येत असतात. खाऱ्या पाण्यात राहणारे फ्लेमिंगो पक्षी आपल्या प्रवासा दरम्यान लोणार सरोवरावर उतरल्याच्या नोंदी आहेत.

## फुलपाखरे











कीटक सृष्टीतील सर्वात सुंदर असेलल्या फुलपाखरांच्या



जैवविविधतेसाठी सुध्दा संपन्न आहे. या अभयारण्य क्षेत्रात ५५ ते ६० च्या जवळपास फुलपाखरांच्या जातीची नोंद झाली आहे. या मध्ये हळदी कुंकू, कृष्णकमलिनी, पट्टेरी रूईकर, कंचा रूईकर, नील रूईकर, छोटा चांदवा, झिंगोरी, राखी भिरभिरी, पित भिरभिरी, नील भिरभिरी, मयूर भिरभिरी इत्यादी प्रकारचे फुलपाखरे पाहायला मिळतात.

## वृक्ष

या अभयारण्य क्षेत्रात वृक्षांच्या ३० प्रजाती आहे. ज्यामध्ये साग, वड, धावडा, कडुलिंब, काटेसावर, बोर इत्यादी स्थानिक प्रजाती तर गुलमोहर, सुबाबुळ इत्यादी विदेशी वृक्षांच्या जाती आहेत.









## सरपटणारे प्राणी







साप व संरड्याच्या विविध जाती इथे पाहायला मिळतात. ज्यामध्ये धामण, नाग, घोणस, अजगर, मण्यार इत्यादी.

## कोळी

लोणार अभयारण्य हे कोळींच्या विविध प्रजातीने ही संपन्न व समृध्द आहे. संशोधकांनी केलेल्या शास्त्रीय अभ्यासानुसार ३६ फॅमिलीतील १२० प्रजातीच्या कोळी लोणार












अभयारण्यात आढळले आहेत. संशोधकांनी लोणार अभयारण्यामध्ये नव्याने केलेल्या अभ्यासानुसार Trachelidae या फॅमिलीतील काही कोळीच्या प्रजातींची नोंद भारतात प्रथमताच झाली आहे.

प्रा.डॉ. अतुल बोडखे यांचे संशोधन

## पौराणिक इतिहास




लोणारला पौराणिक व इतिहासिक वारसा लाभला आहे. ऋग्वेद या ग्रंथामध्ये सरोवराचा उल्लेख आहे.



या शिवाय स्कंदपुराण, पद्मा पुराण, आईना अ-अकबरीमध्ये सुध्दा या जलाशया विषयी उल्लेख केले आहेत.

स्थानिकांचे दृढ विश्वासानुसार लवानासुर नावाचा राक्षसं या परीसारतील ऋषीनां त्रास दायचा त्यामुळे ऋषिंनी भगवान विष्णूची आराधना केली आणि भगवान विष्णुने लवणासूर राक्षकाचा वध केला आणि त्यावरून









सुध्दा या सरोवराचे नाव लोणार असे पडले.

अंदाजे १२०० वर्षापूर्वीची मंदिरे येथे







असून उत्तम अशा कलाकृतीची ही मंदिरे आपला देशाच्या कलाकृतीचा ठेवा आहे म्हणून

ही मंदिर सुध्दा जतन व संवर्धन केले आहे. १५ मंदिर ही लोणार विवरातच आहे.

(लोणार दर्शन पुस्तक)









अमेरिकेतील स्मिथसोनियन संस्था व युनायटेड स्टेट्स ऑफ जियोग्राफिकल सर्वे तसेच भारतातील जिओलॉजिकल सोसायटी ऑफ इंडिया व फिजिकल रिसर्च लॅबोरेटरी या सारख्या नामवंत संस्थानी या सरोवराविषयी खूप संशोधन केले आहे तर इतरही विद्यापीठ विविध विषयाच्या स्वरूपाने लोणार सरोवर व अभयारण्याती जैवविविधतेवर संशोधन करतात.

## लोणार संवेदनशील क्षेत्र



लोणार अभयारण्याची सीमा १०० मीटर पर्यंत असून, या सीमेचे संरक्षण व सुरक्षित ठेवणे आवश्यक असल्याच्या अनुषंगाने केंद्र सरकारच्या अधिसुचनेनुसार २१ फेब्रुवारी २०१७ नुसार लोणार वन्यजीव अभयारण्यांच्या आजू-बाजूचे क्षेत्र पर्यावरण संवेदनशील क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे.

## राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण

राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण (NTCA) यांच्या मार्गदर्शक सुचनेनुसार ४ डिसेंबर २०१८ ला लोणार वन्यजीव अभयारण्याच्या

व्यवस्थापनाची जबाबदारी मुख्य वनसंरक्षक यांच्याकडे सोपवली आहे. सदर अभयारण्य क्षेत्राचे कार्य हे मेळघाट व्याघ्र प्रकल्प अमरावती कार्यालय मार्फत सर्व उपक्रम व दिशा राबविण्यात येते.

## निसर्ग पर्यटन

जागतिक स्तरावर प्रसिध्द पावलेले लोणार सरोवर व अभयारण्य बघायला देश विदेशातून पर्यटकांची नियमित रेलचल असते. लोणार अभयारण्याला भारत सरकारने A" स्थराचा पर्यटन दर्जा २००१ मध्ये दिला आहे. या शिवाय वैज्ञानिक, संशोधक, विविध विद्यापीठातील विद्यार्थी, Ph.D. संशोधन येथे









विविध विषयांवर अभ्यासाकरिता लोणार अभयारण्यामध्ये येत असतात.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पाने अधिकृत केलेले २४ निसर्ग मार्गदर्शक पर्यटकांना या अभयारण्यातील जैवविविधता, सरोवर व इतर महत्वाच्या बाबीबद्दल मार्गदर्शक करतात. हे निसर्ग मार्गदर्शक पर्यटकांना पैदल भ्रमंतीव्दारे या सरोवर, पक्षी, प्राणी, फुलपाखरे या सोबतच पुरातन काळातील मंदिराबद्दल सविस्तर व महत्वपूर्ण माहिती देतात व त्या मोबादल्यामध्ये प्रती मार्गदर्शक ३५० रूपये त्यांना पर्यटकांना कडून मिळतात. या पर्यटनामुळे स्थानिक युवकांना रोजगार उपलब्ध झाला. लोणार अभयारण्य व पर्यटक यांच्यातील महत्वाचा दुवा म्हणून निसर्ग मार्गदर्शक असतात.

## संरक्षण व संवर्धन व्यवस्थापन



या जागातिक वारसाचे अभयारण्यमध्ये रूपांतर केल्यानंतर या क्षेत्राचे संवर्धन व संरक्षण करण्याकरिता अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्त केली गेली आहे.



ज्यामध्ये वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपाल, ६ वनरक्षक हे प्रत्यक्ष लोणार अभयारण्यामध्ये गस्ती करणे, अवैध बाबीं न होऊ देणे इत्यादी प्रकारे संरक्षण करतात.



सोबतीला सोभवताल लक्ष्य

ठेवण्याकरिता २४ तास ई-सर्विलंस कॅमेरे सुध्दा अभयारण्य क्षेत्रामध्ये नियमित लावण्यात आले







आहे. या शिवाय वन्य प्राण्यांचे अस्तित्व, अभ्यास व संरक्षणाकरिता स्वयम चलित कॅमेरेसुध्दा अभयारण्य क्षेत्रामध्ये नियमित लावण्यात येते व यावरून वन्य प्राण्यांची संख्या, हालचाल संशोधन व शास्त्रीय दृष्टीकोनातून महत्वाची ठरते.

## गुलाबी रंगाचे पाणी



मध्यतरी लोणार सरोवरातील पाणी गुलाबी रंगाचे झाले होते, त्यांची दखल विविध माध्यमातून सर्वीकडे पसरलेली आणि सर्व सामन्य लोकांनाही या गोष्टीचे आश्चर्य वाटले. मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या वतीने तेथील पाण्याचे जलाशयाच्या विविध भागातून पाण्याचे नमुने घेतले आणि



NERRI, नागपूरला पाठविण्यात आले. त्यानंतर NERRI, नागपूरची संशोधकांनी येऊन १० फुट सरोवरामध्ये जाऊन पाण्याचे नमुने गोळा केले. NERRI ने त्यावर संशोधन करून निष्कर्ष लावला कि, मागच्या १० वर्षाच्या उपलब्ध रेकोर्डनुसार या सरोवरातील पाण्याची पातळी कमी झाली आहे ज्याला लेस देण ५०% असे म्हणून Dissolved Solid चे प्रमाण वाढलेले असून तापमान हुमिडिटी व TDS (Total Dissolved Solid) एकत्रित परिणामामुळे पाण्यामध्ये असलेला शेवाळ हा गुलाबी रंगाचा झाला असावा असे वैज्ञानिकांचे मत आहे.

आगरकर संशोधक संस्था पुणे यांच्या निष्कर्ष व अभ्यासानुसार हिरव्या रंगातून गुलाबी रंगामध्ये रूपांतर होण्याचे कारण असे ही असू शकते कि,

Change in color of the Lonar Lake Water from Green to Pink was due to the dominance of pink pigment producing halophilic microbers. ARI assume that, absence of rain and high temperature resulted in evaporation of water which increased the salinity of water. The increased salinity facilitated growth of halophilic microbes, mainly haloarchae. The haloarchaea of genus Haloferax, Halococcus and Halobacterium are reported to produce different groups of carotenoids like a-bacterioruberin, trans-bacterioruberin and lycopence.

असे आगरकर रिसर्च संस्था, पुणे येथील शास्त्रज्ञांनी मेळघाट व्याघ्र प्रकल्पाकडे सपुर्द केलेल्या अहवालामध्ये नमूद केले आहे.

## पुरातन काळातील मंदिरे

कर्नल मौकेंझी यांनी लोणारचा सविस्तर व पध्दतशीर अभ्यास केला होतात. त्यांच्या नोंदीनुसार लोणारला ३२ मंदिर, १७ स्मारक, १३ कुंड, ५ शिलालेख आहेत, त्यापैकी २७ मंदिर, ३ स्मारक व ७ कुंड आणि ३ शिलालेख सरोवराच्या आत व बाह्यकडावर आहेत व ५ मंदिर, १४ स्मारक व ६ कुंड विवराच्या बाहेर आहेत. यातील काही मंदिर ८-९ व्या शतकातील चालुक्य काळातील असून काही यादव कालीन हेमाडपंती आहेत. यातील काही मंदिर शिवाची काही विष्णूची तर काही देवीची आहेत. काही ठिकाणी अजून ही पूजा-अर्चना होत असते.







# छायाचित्र सौजन्य

लोणार वन्यजीव अभयारण्य माहिती पुस्तिका करीता छायाचित्रकांरानी उत्तम व सुंदर छायाचित्र उपलब्ध करून दिले. त्याकरिता मेळघाट व्याघ्र प्रकल्प सर्वांचे मनापासून आभारी आहे.

आम्ही लोणारकर ग्रुप, लोणार

- डॉ. सावन देशमुख
- डॉ. अतुल बोडखे
- डॉ. जयंत वडतकर
- डॉ. मिलींद शिरभाते
- श्री. अमोल सावंत
- श्री. विशाल बनसाडे
- श्री. दुर्गाप्रसाद श्रीवास्तव
- श्री. अजय देशमुख
- श्री. शैलेश सदार
- श्री. प्रफुल्ल सावरकर
- श्री. जीवन दहीकर
- लोणार वन्यजीव अभयारण्य
- गुगल माध्यम

LONAR WILDLIFE SANCTUARY
www.lonarwildlifesanctuary.com


चला भेट देऊ या!....
लोणार वन्यजीव अभयारण्य
माहितीकरिता संपर्क: अकोला वन्यजीव विभाग, अकोला, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती
Website: www.magicalmelghat.com, www.lonarwildlifesanctuary.com
E-mail: projecttigermelghat@gmail.com, lonarwildlifesanctuary@gmail.com
Phone No.: 0721-2662792
LONAR
WILDLIFE SANCTUARY
www.lonarwildlifesanctuary.com